| MHST160005772018 | **नि.दि.मु.क्र. ५३/२०१८ मधील नि.४६` वरील आदेश (जगु उर्फ जगन्नाथ गोविंद वााशिवले वि. निलेश जगु उर्फ जगन्नाथ वाशिवले व इतर ) (पारित दिनांक २२.०८.२०२३)** |
|---|---|

वादीचे वारसांतर्फे सदरचा अर्ज वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, सदरचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द जाहीर ठराव व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील वादी जगु उर्फ जगन्नाथ गोविंद वााशिवले हे दि.११.०५.२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादी यास अर्जात नमुद पत्नी संगिता जगु उर्फ जगन्नाथ वााशिवले ही कायदेशीर वारस आहे. दाव्याचे सरनाम्यात वादीचे नावास कंस करुन वादीचे नावापुढे 'मयत' असा शब्द लिहिणेस व सरनाम्यात पुढीलप्रमाणे वारस समाविष्ठ करण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती होवून मिळण्याची विनंती केली आहे.

**श्रीमती संगिता जगू उर्फ जगन्नाथ वाशिवले**
**उ.व.५५ वर्षे, धंदा–शेती**
**रा. वाशिवली, पो. वासोळे, ता. वाई, जि. सातारा**

३. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर अर्जावर नि.४९ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी वारस यांनी सदरच्या वारस रेकॉर्डवर घेण्याच्या अर्जामध्ये कोणतेही संयुक्तीक कारण नमुद केले नाही.दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हा मुळ वादीचा वारस आहे. मुळ दाव्यात प्रतिवादी क्र.१ हा मुळ वादी यांचा दत्तक मुलगा आहे असा वारसांबाबतचा मजकुर असताना सदरची वस्तुस्थिती वादीचे वारसांनी सदर अर्जामध्ये लपवून ठेवली आहे. तसेच सदरच्या अर्जात नमुद केलेले वारसाचे नाव हे चुकीचे लिहले गेले आहे कारण मुळ वादी यांची त्यांचे हयातीत ४/५ लग्ने झालेली होती. त्यामुळे मुळ वादी यांचे अर्जातील नमुद केलेले वारस हे कधीही कायदेशीर पत्नी अथवा वारस नव्हती. वादी वारस म्हणुन वारस दाखला

संबंधीत व्यक्तीने घेतलेशिवाय संगिता हिला मुळ वादीचे वारस ठरविता येणार नाही. संगिता हिने देखील मूळ वादीचे सोबत लग्न करण्याअगोदर २ लग्न केलेली होती. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी वरिष्ठ न्यायालयात नि. ५ वरील केलेले अपील मंजुर करण्यात आले त्यामध्ये वादीचे वारस नियमीत तारखांना हजर होते त्यामुळे त्यांना वादी मयत असल्याबाबत व सदरचे प्रकरण हे वाई न्यायालयात प्रलंबित असल्याची माहिती होती. तसेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.५ हे देखील मयत असलेबाबत वादीचे वारस यांना माहिती आहे व त्याबाबतीच पुराशीस प्रतिवादी क्र.१ तर्फे दाखल केलेली आहे. त्याबाबत देखील वादीचे वारसांनी कोणतीही तजवीज केली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**४.** वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द वाटप व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. वादीचे वारसांनी सदर कथनांचे पृष्ठर्थ वादी जगु उर्फ जगन्नाथ गोविंद वाशिवले हे दि.११.०५.२०२१ रोजी मयत झालेबाबत मृत्युचे प्रमाणपत्र नि.४१ वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ने जरी वादीचे वारसांबाबत हरकत घेतली असली तरी त्याबाबत त्याने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच सदरची बाब ही दाव्याचे चौकशीचे कामी ठरणार आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. करीता, वादीचा अर्ज र.रु. १००/– इतका खर्च लादुन, अर्ज मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**२.** खर्चाची रक्कम रुपये १००/– वादीचे वारसांनी प्रतिवादी क्र.१ यांना दिल्यानंतर वारस १४ दिवसांच्या आत अभिलेखावर घेण्यात येवुन दावा दुरुस्त प्रत मुदतीत दाखल करावी.

SMRUTI SATISH KULKARNI

Digitally signed by SMRUTI SATISH KULKARNI
Date: 2023.08.25 11:29:54 +0530

ठिकाण – वाई. (एस. एस. कुलकर्णी)

दिनांक – २२.०८.२०२३. ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.